# ‘सारथी’च्या निबंधकांची शिवाजी विद्यापीठास भेट

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेचे (सारथी) निबंधक अशोक पाटील यांनी नुकतीच कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. ग्रंथभेट देऊन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्यांचे स्वागत केले.

अप्पर जिल्हाधिकारी असलेले पाटील हे मूळचे अंबप-पाडळी (ता. हातकणंगले) येथील असून ‘सारथी’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे अनेक उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. ‘सारथी’ योजनेतून ५३ विद्यार्थी केंद्रीय सेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. शंभर विद्यार्थ्यांना पीएच.डी. साठी फेलोशिप देण्यात येत आहे. पोलीस भरतीसाठी इच्छुक असलेल्या ५ हजार उमेदवारांना ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



**कोल्हापूर : ‘सारथी’चे निबंधक अशोक पाटील यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

‘सारथी’तर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळवून देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सुरुवातीपासून प्रयत्नशील आहे. संयुक्त विद्यमाने विद्यार्थीहिताचे इतर काही उपक्रम राबविता आले, तर त्यासाठी विद्यापीठ सकारात्मक आहे, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. ए. डी. जाधव उपस्थित होते.